‘स्टार्स’ प्रकल्प

# अंगणवाडी सेविकांसाठी ऑनलाइन प्रशिक्षण (पर्यवेक्षिकांसाठी माहितीपत्रक)

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये केलेल्या शिफारसींनुसार देशातील शैक्षणिक टप्प्यांची पुनर्रचना करण्यात येत आहे. धोरणामध्ये सुचविण्यात आलेल्या नवीन संरचनेनुसार वय वर्षे ३ ते ८ हा कालावधी पायाभूत टप्पा म्हणून जाहीर करण्यात आला आहे. या टप्प्यामध्ये प्राथमिक शाळेची पहिली दोन वर्षे व त्याआधीची बालशिक्षणाची ३ वर्षे अशा एकंदर ५ वर्षांचा समावेश होतो. बालकाच्या भावी आयुष्याची पायाभरणी करण्याच्या दृष्टीने ही वर्षे अत्यंत महत्त्वाची आहेत, असे आधुनिक मेंदूशास्त्र सांगते. या कालावधीमध्ये बालकाच्या विकासाला पोषक वातावरण व संधी मिळाल्यास मेंदूतील चेतापेशींच्या जोडण्यांची संख्या वाढत जाते व त्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या सर्वांगीण विकासावर घडून येतो. बालविकासाच्या या सर्व प्रक्रियेमध्ये अंगणवाडी सेविकेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अंगणवाडीमध्ये दिले जाणारे बालशिक्षण बालकाच्या जीवनाचा आणि पुढील शिक्षणाचा पाया मजबूत करते.

अंगणवाडीमध्ये बालकाची शाळापूर्व तयारी योग्य रीतीने करण्यासाठी गाणी, गोष्टी, खेळ, कला, वाचन, लेखन व गणनपूर्व तयारी आणि सर्जनात्मक अनुभव यांच्याद्वारा शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक व भाषिक विकास साध्य केला जातो. त्यासाठी अंगणवाडी सेविकेला बालशिक्षणातील आधुनिक संकल्पना व उपक्रम माहीत होणे आवश्यक आहे. तिचे काम तिला अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, एकात्मिक बालविकास सेवा योजना व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालशिक्षणाचे ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

या अभ्यासक्रमात १६ घटकसंच (मोड्युल्स) असून ते ९० दिवसांमध्ये पूर्ण करायचे आहेत. बालशिक्षणाशी संबंधित सर्व महत्त्वाच्या संकल्पना या १६ मोड्यूल्समध्ये स्पष्ट केल्या आहेत. ही सर्व मोड्यूल्स महाराष्ट्र शासनाने तयार केलेला आकार अभ्यासक्रम, एनसीईआरटीने तयार केलेला पूर्वशालेय अभ्यासक्रम व केंद्रशासनाने विहित केलेली निपुण भारत मार्गदर्शक तत्त्वे या तीन दस्तऐवजांनुसार तयार करण्यात आलेली आहेत. हा अभ्यासक्रम ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. अंगणवाडी सेविका पूर्वशालेय शिक्षणाचा कालावधी वगळता कधीही त्यांच्या सोयीने या सर्व मोड्यूल्सचा अभ्यास क्रमाने करू शकतात.

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

‘STARS’ प्रकल्प अंतर्गत मोफत वितरणासाठी

### घटकसंच/मोड्यूल्सची यादी :

| अ. क्र. | घटकसंचाचे (मोड्यूलचे) नाव |
|---|---|
| १. | आरंभिक वर्षांचे महत्त्व आणि मेंदूचा विकास. |
| २. | ३ ते ६ वर्षे वयातील विकास. |
| ३. | अ व ब : शाळापूर्व तयारी अभ्यासक्रमाची ओळख. |
| ४. पद्धती. | अ. दैनंदिन आणि साप्ताहिक नियोजन करताना पाळणे आवश्यक आहेत अशा<br>ब. आरंभिक बालशिक्षण कार्यक्रमासाठी दैनंदिन आणि साप्ताहिक वेळापत्रक बनविणे. |
| ५. | अ व ब : मुलांसाठी विकासाच्या टप्प्यानुसार योग्य असे उपक्रम.<br>क : मुलांच्या विकासाच्या टप्प्यानुसार योग्य असे शैक्षणिक साहित्य. |
| ६. | उपक्रम कोपरे आणि जागेचे व्यवस्थापन. |
| ७. | मुलांमधील दोष लवकरात लवकर ओळखून रेफरल (संदर्भ) सेवा देणे. |
| ८. | अंगणवाडीच्या उपक्रमामध्ये विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे समावेशन. |
| ९. | गोष्ट सांगणे. |
| १०. | मुक्त आणि दिशा दिलेले खेळ आयोजित करणे. |
| ११. | मुक्त आणि दिशा दिलेली चर्चा आयोजित करणे. |
| १२. | अ : प्रारंभिक साक्षरता कौशल्य व वाचन–लेखनाची तयारी.<br>ब : गणितीय संकल्पना आणि अंकांच्या संकल्पनेचा विकास. |
| १३. | अ व ब : मुलांचे शिकणे आणि विकासाचे मूल्यमापन. |
| १४. | अ : अंगणवाडी उपक्रमांमध्ये पालकांचा आणि समाजाचा सहभाग.<br>ब : प्रारंभिक बाल्यावस्था देखभाल आणि शिक्षण दिन साजरा करण्याची योजना आखणे. |
| १५. | सुजाण पालकत्व. |
| १६. | अ व ब : शाळा पूर्वतयारी उपक्रम. |

### ही मोड्यूल्स अंगणवाडी सेविकेला कोठे उपलब्ध होतील?

- ही मोड्यूल्स ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. https://unilearn.org.in या लिंकद्वारे तसेच Unilearn Maharashtra या मोबाइल ॲपवर यूजर आयडी व पासवर्ड टाकून लॉगईन व्हावे व मोड्यूल पहावेत/सोडवावेत.

### ही मोड्यूल्स अंगणवाडी सेविकेने कधी बघायची?

- अंगणवाडी सेविकेने ही मोड्यूल्स पूर्वशालेय शिक्षणाचा कालावधी वगळता उपलब्ध वेळेमध्ये बघायची आहेत.

### प्रत्येक मोड्यूल कसे पूर्ण करायचे?

- प्रत्येक घटकसंच स्मार्टफोनवर पूर्णपणे बघायचा.
- मोड्यूलमध्ये दिलेले बहुपर्यायी प्रश्न सोडवायचे.
- प्रत्येक मोड्यूलसाठी स्वाध्याय किवा प्रात्यक्षिक कार्य दिलेले आहे. त्याची माहिती प्रत्येक मोड्यूलमध्ये तसेच अंगणवाडी सेविकेला दिलेल्या हस्तपुस्तिकेमध्ये दिलेली आहे.

- एकूण १६ मोड्यूल्समधून ८ मोड्यूल्ससाठी प्रत्येकी किमान ४ स्वाध्याय व ८ मोड्यूल्ससाठी प्रत्येकी किमान ४ प्रात्यक्षिक कार्ये दिलेली आहेत.

### स्वाध्याय म्हणजे काय ?

- ८ मोड्यूल्समध्ये प्रत्येकी ४ स्वाध्याय दिलेले आहेत. हे स्वाध्याय अंगणवाडी सेविकेचे त्या मोड्यूल्समधील संकल्पना/आशयाचे आकलन तपासण्यासाठी दिलेले आहेत.
- दिलेले मोड्यूल पाहून स्वाध्याय झाल्यावर एका स्वतंत्र वहीमध्ये/पानांवर दिलेल्या ४ प्रश्नांपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर अंगणवाडी सेविकेने लिहायचे आहे. प्रश्नाची निवड अंगणवाडी सेविकेने करायची आहे.

### प्रात्यक्षिक म्हणजे काय ?

- या हस्तपुस्तिकेमध्ये ८ मोड्यूल्ससाठी प्रात्यक्षिक कार्ये दिलेली आहेत. क्षेत्रकामासाठी दिलेले उपक्रम अंगणवाडी सेविकेने प्रत्यक्ष अंगणवाडीमध्ये घ्यायचे आहेत.
- **मोड्यूलमध्ये दिलेल्या ४ प्रात्यक्षिकांपैकी फक्त १ उपक्रम** करायचा आहे.
- उपक्रमाची निवड अंगणवाडी सेविकेने करायची आहे.

### या प्रशिक्षणाचा कालावधी किती आहे ?

- हा पूर्ण कार्यक्रम ५० तासांचा आहे. यांपैकी १० तास ऑनलाइन घटकसंच बघण्यासाठी आहेत.
- १२ तास सेविकांचे बीट स्तरावर उद्बोधन /मार्गदर्शन यांसाठी आहेत.
- १२ तास स्वाध्याय सोडविण्यासाठी आहेत. १६ तास प्रात्यक्षिक कार्य करण्यासाठी आहेत.
- हा कार्यक्रम अंगणवाडी सेविकेने नाव रजिस्टर केल्यापासून ९० दिवसांमध्ये पूर्ण करावयाचा आहे.
- अंगणवाडी सेविकांनी ८ स्वाध्याय व ८ प्रात्यक्षिके पूर्ण करून त्यांचे अहवाल पर्यवेक्षिकेला सादर करावयाचे आहेत.
- प्रात्यक्षिकाच्या अहवालाचा आराखडा पुढे दिला आहे.

### पर्यवेक्षिकेची भूमिका :

- दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उद्बोधन /मार्गदर्शन सत्रे घ्यायची आहेत.
- एखादा मोड्यूल किंवा त्यातील एखादी संकल्पना अंगणवाडी सेविकेला समजली नसल्यास तिला ते समजावून देणे.
- अंगणवाडी सेविकेला कामाचे नियोजन करण्यास सहकार्य करणे.
- स्वाध्याय व प्रात्यक्षिके वेळच्या वेळी पूर्ण करण्यास अंगणवाडी सेविकेला प्रोत्साहन देणे.
- स्वाध्याय व प्रात्यक्षिकांचे अहवाल लिहिण्यासाठी सेविकेला दोन स्वतंत्र वह्या किंवा एका वहीच्या दोन स्वतंत्र भागामध्ये किंवा स्वतंत्र फुलस्केप पानावर लिहिण्यास सांगणे.
- पहिल्या उद्बोधन सत्रामध्ये सेविकांना पहिले १–८ मोड्यूल्स पुढील ६ आठवड्यांमध्ये (४५ दिवस) बघण्यास सांगणे. तसेच त्या मोड्यूल्समध्ये दिलेले स्वाध्याय/प्रात्यक्षिके पूर्ण करण्यास सांगणे.
- ६ आठवड्यांनंतर (४५ दिवस/दीड महिना) सेविकांसाठी ४ तासांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करणे. या सत्रामध्ये सेविकांचे स्वाध्याय व प्रात्यक्षिक अहवाल तपासून देणे.
- पहिल्या मार्गदर्शन सत्रामध्ये पुढची ९ ते १६ मोड्यूल्स बघण्यास सूचना देणे व स्वाध्याय, प्रात्यक्षिक कामकाज पूर्ण करण्यास सांगणे.
- ८ पैकी कोणतीही २ प्रात्यक्षिके सेविका प्रत्यक्ष करीत असताना बघावीत. उदा. क्षेत्रभेट किंवा बालकांना गोष्ट सांगणे.
- प्रत्येक स्वाध्याय व प्रात्यक्षिकाच्या अहवालाखाली तपासून सही करावी.
- एखाद्या प्रश्नाचे उत्तर समाधानकारक न वाटल्यास मार्गदर्शन करून ते सेविकेला पुन्हा लिहायला सांगावे व पुन्हा तपासून समाधानकारकअसा शेरा द्यावा.
- एखादे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष बघताना किंवा त्याचा अहवाल वाचताना समाधानकारक न

वाटल्यास सेविकेला मार्गदर्शन करून ते प्रात्यक्षिक पुन्हा करण्यास सांगावे व पुन्हा तपासून समाधानकारक असा शेरा द्यावा.

- पुढील मोड्यूलसाठी स्वाध्याय लिहायचे आहेत – मोड्यूल क्र. १, ३, ७, ८, १०, १२, १३, १४.
- पुढील मोड्यूलसाठी प्रात्यक्षिके करायची आहेत – मोड्यूल. क्र. २, ४, ५, ६, ९,११, १५, १६.
- अंगणवाडी सेविकेकडे स्मार्टफोन नसल्यास पर्यायी व्यवस्था – अंगणवाडी सेविकेकडे स्मार्टफोन उपलब्ध नसल्यास पर्यवेक्षिकेने तेथील स्थानिक शाळा/ग्रामपंचायत/आपले सरकार केंद्र / इतर सहकारी / पालक यांच्या सहकार्याने पर्यायी व्यवस्था (मोबाईल/इंटरनेट) उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- अंगणवाडी सेविकेने प्रत्येक मोड्यूल अभ्यासल्यावर व त्या मोड्यूलचा स्वाध्याय/प्रात्यक्षिक पूर्ण केल्यावर पर्यवेक्षिकेने ऑनलाइन पोर्टलवर जाऊन त्याची नोंद करावी.
- सर्व १६ स्वाध्याय/प्रात्यक्षिके अंगणवाडी सेविकेने पूर्ण केल्याची नोंद पर्यवेक्षिकेने केल्यावर संबंधित सेविकेने प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र ऑनलाइन दिले जाईल.

## प्रात्यक्षिक कार्याचा अहवाल आराखडा

- मोड्यूल क्र. ____________
- प्रात्यक्षिक उपक्रमाचे नाव : ____________________________________________
- साहित्य : ____________________________________________
- कृती : (उपक्रम कसा घेतला त्यांचे वर्णन करावे. उपक्रम घेताना दिलेल्या सूचना लिहाव्यात.)
- निरीक्षणे : (बालकांनी कशा प्रकारे कृती केली, बालक/पालक यांनी कोणते प्रश्न विचारले अनुभव सांगितले ते लिहावे.)
- प्रशिक्षण कार्यक्रमाचे टप्पे : ____________________________________________

**'स्टार्स' प्रकल्प — अंगणवाडी सेविकांचे ऑनलाइन प्रशिक्षण**

| प्रशिक्षण ओघ तक्ता (Flow Chart) | जबाबदारी |
|---|---|
| जिल्हा कार्यक्रम अधिकारी (ICDS), जि. प. आणि नोडल अधिकारी (DIET) यांचे एक दिवसीय उद्बोधन (राज्यस्तर), (Online/Offline) | SCERTM |
| ↓ पर्यवेक्षिका यांचे एक दिवसीय उद्बोधन (जिल्हा स्तर), (Online/Offline) | DIET |
| ↓ अंगणवाडी सेविकांचे उद्बोधन सत्र – बीट स्तर (४ तास) | अंगणवाडी पर्यवेक्षिका |
| ↓ मोड्यूल क्र. १ ते ८ पाहणे, स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करणे. | सेविका |
| ↓ मार्गदर्शन सत्र १ | पर्यवेक्षिका |
| ↓ मोड्यूल क्र. ९ ते १६ पाहणे, स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करणे. | सेविका |
| ↓ मार्गदर्शन सत्र २ | पर्यवेक्षिका |
| ↓ प्रशिक्षण प्रमाणपत्र ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध करून देणे. | SCERTM |

## अंगणवाडी सेविकांचे ऑनलाइन प्रशिक्षण

| अ. क्र. | कामकाज व कालावधी (घड्याळी तास) | कार्यपद्धती |
|---|---|---|
| १) | प्रशिक्षणार्थी सेविकांचे उद्बोधन सत्र (४ तास) | अंगणवाडी सेविकांना ऑनलाइन प्रशिक्षणाची माहिती या उद्बोधन सत्रात देण्यात येईल.<br>उद्बोधन सत्र आयोजन कार्यवाही पुढील प्रमाणे करण्यात येईल.<br>१. अंगणवाडी पर्यवेक्षिका बीटस्तरीय उद्बोधन सत्राचे आयोजन करतील.<br>२. दोन किंवा अधिक बीटातील सेविकांसाठी सबंधित पर्यवेक्षिका विचार विनिमयाने एकाच ठिकाणी उद्बोधन सत्राचे आयोजन करू शकतील.<br>३. एकूण १६ ऑनलाईन घटकसंच, त्यांची नावे ही माहिती पर्यवेक्षिका सेविकांना देतील.<br>४. प्रत्येक घटकावर आधारित असलेले स्वाध्याय/क्षेत्रकाम ओळख व ते पूर्ण करणे बाबतची माहिती पर्यवेक्षिका अंगणवाडी सेविकांना देतील.<br>५. सेविकांनी आपला लॉगइन आयडी व पासवर्डचा वापर करून स्वत:च्या मोबाईलद्वारे प्रशिक्षण पोर्टलवर लॉगइन करणे, व मोड्यूल क्र. १ – आरंभिक वर्षांचे महत्त्व आणि मेंदूचा विकास हे मोड्यूल पाहणे. याकरिता पर्यवेक्षिका सेविकांना मदत करतील. अशाच प्रकारे पुढचे मोड्यूल प्रशिक्षण पोर्टलवर पाहणे व स्वाध्याय व प्रात्यक्षिक काम पूर्ण करण्याबाबत पर्यवेक्षिका सूचना देतील.<br>६. मार्गदर्शन सत्र १ व २ आयोजन, त्यामध्ये स्वाध्याय व प्रात्यक्षिक कामकाज तपासणे व त्याची नोंद पोर्टलवर केली जाणार असल्याची माहिती देणे. सर्व मोड्यूल पाहिले स्वाध्याय व प्रात्यक्षिक कामकाज पूर्ण केल्यानंतरच प्रशिक्षण प्रमाणपत्र पोर्टलवर उपलब्ध होणार असल्याची माहिती देणे.<br>उद्बोधन सत्रामध्ये एकंदरीत प्रशिक्षण कामकाजाची सर्व माहिती पर्यवेक्षिका या सेविकांना देतील व त्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजाचे पुढील नियोजन सांगतील. |
| २) | सेविकांनी मोड्यूल पाहणे/सोडविणे. (१० तास) | एकूण १६ मोड्यूल असून सेविकांनी ते पाहावेत/सोडवावेत याकरिता पर्यवेक्षिका यांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करणे.<br>१. ऑनलाइन मोड्यूल पाहण्यासाठी नेटवर्क तसेच Android Mobile उपलब्ध असलेल्या सेविकांनी दिलेल्या नियोजना प्रमाणे स्वत:पोर्टलवर मोड्यूल पाहायची आहेत.<br>२. नेटवर्क तसेच Android Mobile उपलब्ध नसल्यास पर्यवेक्षिका यांनी करावयाचे नियोजन : ऑनलाइन मोड्यूल पाहण्यासाठी नेटवर्क तसेच Android Mobile उपलब्ध नसल्यास पर्यवेक्षिका सबंधित सेविकांना आठवड्यातील एक दिवस अंगणवाडी सुटल्यानंतर (दोन तासासाठी) नेटवर्क असलेल्या ठिकाणी बोलावून मोड्यूल दाखविण्याची व्यवस्था करतील. |

## अंगणवाडी सेविकांचे ऑनलाइन प्रशिक्षण

| अ. क्र. | कामकाज व कालावधी (घड्याळी तास) | कार्यपद्धती |
|---|---|---|
| | | एक मोड्यूल साधारणपणे १० ते २५ मिनिटांचे आहे.<br>अंगणवाडी सेविकांनी स्वत:चा यूजर आयडी व पासवर्ड वापरून लॉगिन करणे व मोड्यूल पूर्ण पाहणे अपेक्षित आहे. त्याकरिता सेविकांनी स्वत:चा/ कुटुंबातील अन्य सदस्य/सहकारी यांचा मोबाईल वापरता येईल. |
| ३) | मार्गदर्शन सत्र १/ प्रथम सहविचार सभा (४ तास) | उद्बोधन सत्रानंतर पुढील सहा आठवड्यांनी (४५ दिवस) पर्यवेक्षिका बीट स्तरावर सहविचार सभेचे आयोजन करतील. सहविचार सभेत पुढील प्रमाणे कामकाज होईल.<br>१. मोड्यूल क्र. १ ते ८ पाहून/सोडवून पूर्ण केले बाबत सेविका निहाय आढावा घेणे व आवश्यक बाबतींत मार्गदर्शन करणे.<br>२. सेविकांनी मोड्यूल निहाय पूर्ण केलेले स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पर्यवेक्षिका यांनी तपासून त्यावर स्वाक्षरी करावी व सेविकांना लिखित काम पुढील उपयोगासाठी जतन करून ठेवण्याकरिता परत करणे. सेविकांनी स्वाध्याय व प्रात्यक्षिक कामकाज पूर्ण केले बाबतची नोंद ऑनलाइन प्रशिक्षण पोर्टलवर करणे.<br>३. मोड्यूल क्रमांक ९ ते १६ पाहणे व स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करणेबाबत सूचना देणे/मार्गदर्शन करणे. |
| ४) | मार्गदर्शन सत्र २/ द्वितीय सहविचार सभा (४ तास) | पहिल्या सहविचार सभेनंतर पुढील सहा आठवड्यांनी (४५ दिवस) पर्यवेक्षिका दुसऱ्या/अंतिम सहविचार सभेचे आयोजन करतील. सभेत पुढील प्रमाणे कामकाज होईल.<br>१. मोड्यूल क्र. ९ ते १६ पाहून/सोडवून पूर्ण केले बाबत सेविका निहाय आढावा घेणे व आवश्यक बाबतींत मार्गदर्शन करणे.<br>२. सेविकांनी मोड्यूल निहाय पूर्ण केलेले स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पर्यवेक्षिका यांनी तपासून त्यावर स्वाक्षरी करावी व सेविकांना लिखित काम पुढील उपयोगासाठी जतन करून ठेवण्याकरिता परत करणे. सेविकांनी स्वाध्याय व प्रात्यक्षिक कामकाज पूर्ण केले बाबतची नोंद ऑनलाइन प्रशिक्षण पोर्टलवर करणे.<br>३. सेविकांनी सर्व मोड्यूल पाहिले तसेच स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केले बाबतची नोंद पर्यवेक्षिकांनी ऑनलाइन पोर्टलवर केल्यानंतर सेविकांना प्रशिक्षण प्रमाणपत्र ऑनलाइन प्रशिक्षणाच्या पोर्टलवर (Auto Generated) उपलब्ध होईल. |
| ५) | स्वाध्याय पूर्तता (१२ तास) | ८ स्वाध्याय (एका स्वाध्याय पूर्ण करण्यासाठी दीड तासाचा कालावधी) |
| ६) | प्रात्यक्षिक कामकाज पूर्तता (१६ तास) | ८ प्रात्यक्षिक कार्य सेविकांनी पूर्ण करणे. (प्रात्यक्षिक कार्य नियोजनासाठी अर्धा तास, प्रात्यक्षिक कार्य अंमलबजावणीसाठी १ तास, प्रात्यक्षिक कार्य अहवाल लेखनासाठी अर्धा तास, एक प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी एकूण २ तास) |

**प्रशिक्षणाचे एकूण तास = ५० तास**